| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.९५६/२०११ |
| सरकार -वि- नितेश |
| निशाणी क्र. १६ |

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ नुसार पुरावा**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | विजय सुरेशराव दासरवार, |
| **वय** | : | ४७ वर्षे, |
| **धंदा** | : | पो.हवा., ब.क्र.३२५३, बेलतरोडी पो.स्टे. |
| **राहणार** | : | सोमवारी क्वार्टर्स, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती अमृता सोले यांचेमार्फत**

दिनांक ०६.०३.२०११ रोजी अंदाजे दुपारी ४.४५ वाजता मी आणि माझा मित्र संदीप गवळी (निलंबीत पो.कॉ) पोलीस मुख्यालयाकडून अजनीकडे त्याच्या दुचाकी वाहनाने जात होतो. संदीप गाडी चालवित होता. आम्ही दोघे अजनी आर.पी.एफ., डॉग कॅनलजवळ पोहोचलो असता आम्हाला मागून एका महिलेचा 'चोर, चोर, पकडा पकडा' असे ओरडण्याचा आवाज आला. आम्ही दोघांनी लगेच गाडी वळवून ओरडण्याच्या दिशेने गेलो असता एका सायकल रिक्षामध्ये बसलेली महिला बोट दाखवून चोर चोर असे ओरडत होती. तेव्हा मी एका ईसमाला पळतांना बघीतले. तो ईसम पळतांना काही तरी फेकल्याचे मला दिसले. मी गाडीवरुन उतरुन त्या ईसमाचा पाठलाग केला व त्याला पकडल्यावर मी त्याने काय फेकले असे विचारले तेव्हा त्याने ज्या ठिकाणी वस्तु फेकली होती ती काढून दिली. सदर वस्तु ही गळयातील सोन्याचे मनी मंगळसुत्र होते. त्याने ते मंगळसूत्र वरील महिलेकडून हिसकावले होते. मी त्यास पकडल्यानंतर गर्दीतील लोकांनी त्याला मारहाण केली.

२. लोकांपासुन त्याला सोडवून त्याला अजनी पोलीस स्टेशनला घेऊन गेलो. त्याला तिथल्या पोलीसांच्या ताब्यात दिले व लेखी रिपोर्ट दिली. मला आता रिपोर्ट दिनांक

०६.०३.२०११ दाखविण्यात आला. तो माझ्या हस्ताक्षरात असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी पी-२** देण्यात आला. ज्या ईसमाला मी पकडले त्याचे नाव त्याने नितेश विघ्ने असे सांगितले होते. त्यास मी बघीतल्यास ओळखू शकतो. आज तो कोर्टासमक्ष हजर नाही.

**सरतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.03.12 16:07:32 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १२.०३.२०२५